**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ ▪ अंक २४५ ▪ शनिवार २७ जून २०२६ ▪ पाने ४ ▪ मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322

# उद्या होणारी टीईटीची परिक्षा स्थगित; पेपर फुटीतील आरोपींचे दिल्ली कनेक्शन

**मुंबई । वृत्तसंस्था**

नीट पाठोपाठ टीईटीचीही परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. येत्या रविवारी (दि. २८ जून) शिक्षक पात्रता परीक्षा होणार होती. मात्र या परिक्षेचे पेपर फुटल्याचे निष्पण झाल्याने ही पात्रता परिक्षा तुर्त स्थगित करून पुढे ढकलण्यात आली आहे. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा पूर्ण पारदर्शकपणेच व्हावी हा परीक्षा परिषदेचा आग्रह असल्याने व याबाबत सखोल चौकशी होणे गरजेचे वाटत असल्याने ही परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहे. शिक्षक पात्रता परिक्षेबाबत अद्यावत माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

### पेपर फुटीप्रकरणी पोलिसांकडून खळबळजनक माहिती

टीईटी पेपर विक्रीसाठी आरोपि दिल्लीतून आले होते. त्यामध्ये, राजीव शाह (बिहार), आकाश कुमार (बिहार) आणि धीरज कुमार (हरियाणा) अशी आरोपींची नावे आहेत.

नीट पेपरफुटीनंतर महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या टीईटी पेपर फुटीचंही आता दिल्ली अन् हरयाणा कनेक्शन समोर आलं आहे. उद्या २८ जून रोजी होणाऱ्या टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करण्यात आली असून पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. विमानतळ परिसरातून भिवंडी पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या. त्यानंतर, अपर पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी पत्रकार परिषद घेऊन टीईटी पेपर फुटीसंदर्भात माहिती दिली. भिवंडी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली असून यातील २ आरोपी बिहारमधील आहेत, तर एक आरोपी हरियाणामधला आहे. दीड कोटी रुपयांत या पेपरचा व्यवहार ठरला होता, मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे ही पेपरफुटी समोर आली. टीईटी पेपर विक्रीसाठी आरोपि दिल्लीतून आले होते. त्यामध्ये, राजीव शाह (बिहार), आकाश कुमार (बिहार) आणि धीरज कुमार (हरियाणा) अशी आरोपींची नावे असून त्यांचे वय अनुक्रमे ४५, दुसरा ३० आणि तिसऱ्याचं २८ वर्षे आहे. मात्र, याप्रकरणातील मुख्य आरोपी अद्यापही फरार आहे. आरोपींकडून या पेपर विक्रीसाठी दीड कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. पोलिसांच्या झडतीत ४ सेट पेपर मिळाले असून मोबाईल डेबिट कार्ड देखील मिळाले आहेत. पोलिसांनी, भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) ३१६(५) ६१(२), सह महाराष्ट्र परीक्षाअधिनियम २०२४ या प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.




### कोचिंग सेंटरचीही चौकशी होणार

दरम्यान, याप्रकरणी स्पेशल नेमण्यात आली असून डीसीपी पवन बनसोडे यांच्यामार्फत ही टीम नेमली आहे. आरोपींना पेपर कुठून मिळाला हे तपासातून कळेल, सर्व शक्यता गृहीत धरली आहे. याप्रकरणातही कोचिंग सेंटर आणि सर्वांची चौकशी करणार असून पेपर घेऊन दिल्लीहून आरोपी इथं पोहोचले आहेत. प्राथमिक तपासात शिक्षण विभागाचा सहभाग आढळला नाही, यातील एका आरोपी केंद्रीय विद्यालयात नोकरी लावण्यासाठी पैसे दिले होते, तर एका आरोपीने ची परीक्षा दिली असून तो त्यात नापास झाला होता.

### परीक्षा शुल्क पुन्हा द्यावे लागणार नाही

महाराष्ट्रातील ६ लाख १२८ शिक्षकांसाठी घेण्यात येणारी टीईटी परीक्षा रद्द करण्यात आली असून ह्या परीक्षेसाठी पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. त्यामुळे, परीक्षेसाठी राज्यातील ६ लाख १२८ परिक्षार्थीकडून अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. येत्या २ ते ३ दिवसांनी टीईटी परीक्षेची नवीन तारीख घोषीत केली जाईल, ३७ शहरातील १०२८ परिक्षा केंद्रावर पुन्हा नव्याने परिक्षा घेतली जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या उपायुक्त प्रिया शिंदे यांनी दिली.

### परीक्षा विभागाकडून पडताळणी

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींसाठी ट्रॅप लावण्यात आला होता. आरोपी दिल्लीवरुन पेपर विकण्यासाठी भिंवडीला आले होते, कोणासाठी पेपर विकायला आले होते, कोणाला विकला, कुणी घेतला? या सर्व बाबींचा तपास करण्यात येत आहे. विशेष म्हणजे, आरोपींकडून जे पेपर विकत घेणार होते, ते विविध रकमा घेऊन पुढे विकणार होते, अशी माहिती समोर आल्याचेही पोलीस आयुक्त अशोक दुधे यांनी दिली. पोलिसांना आढळून आलेले पेपर शिक्षण विभागाला पाठवले, त्यांनी पेपर पडताळले असता हे पेपर त्याच परीक्षेचे आहेत, असे निष्पन्न झाल्याची माहितीही दुधे यांनी दिली.

**छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन**

# आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा - महापौर ज्योतीताई गाडे

### छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महापालिकेच्या स्वच्छता अभियानाचा शुभारंभ; प्रत्येक दहा दिवसांनी शहरभर राबविणार विशेष स्वच्छता मोहीम







**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरभर विशेष स्वच्छता अभियानाला प्रारंभ करण्यात आला. यापुढे प्रत्येक दहा दिवसांनी शहरातील विविध भागांमध्ये विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून नागरिकांनीही या अभियानात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्वच्छतेमुळे शहराचे सौंदर्य वाढतेच, शिवाय नागरिकांचे आरोग्यही सुदृढ आणि निरोगी राहण्यास मदत होते. आमदार संग्राम जगताप हे शहर स्वच्छ व सुंदर राहावे यासाठी सातत्याने स्वतः रस्त्यावर उतरून स्वच्छता अभियानात सहभागी होत असून प्रशासनालाही वेळोवेळी आवश्यक सूचना देत असतात. स्वच्छ शहर घडविण्याची जबाबदारी केवळ महापालिकेची नसून प्रत्येक नागरिकाने आपल्या शहराची जबाबदारी समजून स्वच्छतेबाबत जागरूक राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या माध्यमातून सक्कर चौक येथे विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. महापौर ज्योतीताई गाडे यांनी स्वतः ▪ पान ४ वर

## नाशिकचे आयजी संजय येनपुरे मैदानावर

# अहिल्यानगरमध्ये मोहरम विसर्जन शांततेत

### पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या चोख नियोजनाचे कौतुक!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर –** अतिसंवेदनशील जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अहिल्यानगरमध्ये मोहरम विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणा पूर्णपणे सज्ज होती. या अत्यंत महत्त्वाच्या दिवशी सुरक्षेचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी नाशिक परिक्षेत्राचे कर्तव्यदक्ष आणि सिंघम अधिकारी, विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. संजय येनपुरे यांनी स्वतः अहिल्यानगर जिल्ह्याला भेट दिली. त्यांच्या या अनपेक्षित आणि महत्त्वपूर्ण दौऱ्यामुळे पोलीस दलाचा आत्मविश्वास अधिकच उंचावला.

पोलीस अधीक्षक सुदर्शन यांचे मास्टरप्लॅन नियोजन मोहरम विसर्जनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक श्री. मुमक्का सुदर्शन यांनी जिल्ह्यात सुरक्षेची कोणतीही कमतरता भासू दिली नाही. त्यांच्या थेट मार्गदर्शनाखाली संपूर्ण जिल्ह्यात १ हजाराच्या आसपास मोठा पोलीस बंदोबस्त* तैनात करण्यात आला होता. संवेदनशील भागांवर ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून बारीक लक्ष ठेवले जात होते.

आयजी संजय येनपुरे यांच्याकडून कौतुकाची थाप

विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. संजय येनपुरे यांनी जिल्ह्यातील विविध भागांत जाऊन सुरक्षा व्यवस्थेची आणि बंदोबस्ताची प्रत्यक्ष पाहणी केली. अत्यंत संवेदनशील वातावरण असतानाही, पोलीस प्रशासनाने केलेल्या चोख बंदोबस्तामुळे संपूर्ण जिल्ह्यात विसर्जन शांततेत पार पडले आणि कुठेही कोणतीही अवाढव्य किंवा अप्रिय घटना घडली नाही.

या यशस्वी कामगिरीबद्दल आयजी श्री. संजय येनपुरे यांनी पोलीस अधीक्षक आणि त्यांच्या संपूर्ण अहिल्यानगर पोलीस दलाचे जाहीर ▪ पान ४ वर

# पाचोड बसस्थानकातील मोबाईल शॉपीत चोरी

### पत्रे उचकटून रोकडसह साहित्य लंपास

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** पाचोड बसस्थानक परिसरातील डायमंड मोबाईल शॉपीच्या पाठीमागील पत्रे उचकटून अज्ञात चोरट्याने दुकानात प्रवेश करत काही मोबाईल साहित्य व रोकड लंपास केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली.

दुकानमालक सकाळी दुकान उघडण्यासाठी आले असता पाठीमागील पत्रे उचकटलेली आणि दुकानातील साहित्य अस्ताव्यस्त पडलेले दिसून आले. चोरट्याने दुकानातील काही मोबाईल ॲक्सेसरीज तसेच रोकड चोरून नेल्याचे प्राथमिक पाहणीत समोर आले. घटनेची माहिती मिळताच परिसरात नागरिकांची गर्दी झाली.

या प्रकरणाची माहिती पोलिसांना देण्यात आली असून, घटनास्थळी पाहणी करून पुढील तपास सुरू करण्यात आला आहे. चोरी गेलेल्या मुद्देमालाची नेमकी किंमत पंचनामा झाल्यानंतर स्पष्ट होणार आहे. परिसरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी रात्रीची गस्त वाढवून चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

**अहिल्यानगर महानगरपालिका आणि रोटरी क्लबच्या वतीने राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त सायकल रॅली**

# एकही बालक सुटू नये, हीच पोलिओ निर्मूलनाची गुरुकिल्ली - महापौर

### प्रत्येक डोस मुलांचे संरक्षण अधिक बळकट करतो – आयुक्त यशवंत डांगे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात जनजागृतीपर भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. पोलिओमुक्त भारताचे स्वप्न अधिक भक्कम करण्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने काढण्यात आलेल्या या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, पोलिओ हा लहान मुलांना कायमचे अपंगत्व आणू शकणारा गंभीर विषाणूजन्य आजार आहे. या आजारावर प्रभावी उपचार नसले तरी सुरक्षित आणि प्रभावी लसीकरणाद्वारे त्याचा संपूर्ण प्रतिबंध करता येतो. भारताने पोलिओमुक्त देशाचा मान मिळवला असला तरी जगभरातून पोलिओचे संपूर्ण उच्चाटन होईपर्यंत सतर्कता आणि नियमित लसीकरण सुरू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. ''एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, हीच पोलिओ निर्मूलनाची खरी गुरुकिल्ली आहे,'' असे त्यांनी स्पष्ट केले.





राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या सायकल रॅलीचे उद्घाटन महापौर ज्योतीताई गाडे आणि उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. साहिल शेख, डॉ. वृषाली आरु, डॉ. दिलीप बागल, डॉ. गिरीश दळवी, योगेश औटी, सुमित जाधव, रोटरी क्लबचे अध्यक्ष सुनील कटारिया, सायकल असोसिएशनचे चंद्रशेखर मुळे, डॉ. धनंजय कुलकर्णी, सचिन सातपुते, आशा सेविका, आरोग्य कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने सायकलस्वार उपस्थित होते.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, प्रत्येक पालकाने आपल्या शून्य ते पाच वर्षे वयोगटातील मुलांना नियमित लसीकरणाबरोबरच पल्स पोलिओ मोहिमेतील प्रत्येक डोस देणे अत्यंत गरजेचे आहे. ''माझे मूल निरोगी आहे, त्यामुळे लसीची गरज नाही'' किंवा ''वारंवार लस दिल्याने अपाय होतो'' अशा गैरसमजांना कोणताही वैज्ञानिक आधार नाही. प्रत्येक बालकाचे आरोग्य सुदृढ आणि सुरक्षित राहावे यासाठी रविवार, २८ जून रोजी पालकांनी ▪ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### राज्य विधानसभा अधिवेशनात लोककलावंतांना मानधन वाढवून देण्याची प्रदेशाध्यक्ष धुमाळ यांची मागणी



अहिल्यानगर - हिंदवी रेणुराई गोंधळी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष दशरथ धुमाळ यांनी लोककलावंतांच्या मागण्यांसंदर्भात नुकतीच आमदार संग्राम जगताप यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली व मागणीचे निवेदन त्यांच्याकडे सुपूर्द केले. महाराष्ट्र राज्य विधानसभेचे अधिवेशन २२ जून २०२६ पासून सुरू होत आहे. या अधिवेशनात अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककलावंतांच्या मागण्या आमदारांनी मांडाव्यात, अशी विनंती श्री. धुमाळ यांनी यावेळी आमदार संग्राम जगताप यांच्याकडे केली.ब पारंपरिक लोककलावंतांची निवड इष्टांक ५०० पाचशे करावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्हा क्षेत्रफळाने मोठा असल्याने आणि या जिल्ह्यात एकूण १४ तालुके असल्याने कलावंतांची निवड करण्यासाठी इष्टांक ५०० करावा आणि लोककलावंतांच्या मानधनामध्ये वाढ करून ते प्रतिमहा दहा हजार रुपये करावे, असे श्री. धुमाळ यांनी निवेदनात म्हटले आहे.लोककलावंत हे भारतीय संस्कृतीचे रक्षक आहेत. ते शहर, गाव, वाड्या-वस्त्या, तांडे, डोंगर, पहाड आदि सर्वच दुर्गम भागात जातात. पाऊसपाणी, ऊन वा थंडी अशा कोणत्याही ऋतूत ते आपल्या रोजीरोटीसाठी कला सादर करून संस्कृतीचे रक्षण करतात. यामधून त्यांना अत्यंत अल्प मानधन मिळते. त्यामुळे त्यांना शासकीय मदतीची आवश्यकता आहे. याचा सहानुभूतीने विचार करून शासनाने लोककलावंतांना मानधन वाढवून द्यावे, अशी आग्रहाची मागणी श्री. धुमाळ यांनी या निवेदनातून केली आहे.

### जैन भंडारी-भंडारी मुथा फाउंडेशनतर्फे नगरमध्ये उद्या रोजी राज्यस्तरीय पारिवारिक संमेलन

अहिल्यानगर - समाजाची एकता, संस्कृती, परंपरांचे जतन करणे आणि तरुण पिढीला प्रेरणादायी मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने जैन भंडारी-भंडारी मुथा फाउंडेशनच्या वतीने नगरमध्ये भंडारी-भंडारी मुथा पारिवारिक संमेलन २०२६ चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. उद्या रविवार, २८ जून २०२६ रोजी सकाळी ९ वाजता निल लॉन्स, केडगाव, अहिल्यानगर येथे हे संमेलनाचा शुभारंभ होईल. संमेलनाचे स्वागताध्यक्ष राजेश संतोष भंडारी (महावीर ग्रुप, टाकळी ढोकेश्वरवाला) यांनी नगरसह संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या समाजातील सर्व कुटुंबांना जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून हा ऐतिहासिक सोहळा यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. भंडारी-भंडारी मुथा समाजाच्या एकतेला नव्या उंचीवर नेण्यासाठी, समाजातील अनुभवी व प्रेरणादायी व्यक्तींकडून ज्ञान आणि मार्गदर्शन मिळवण्यासाठी, तरुणांना संस्कार, शिक्षण व नेतृत्वाची दिशा देण्यासाठी, आपल्या मुळांशी, परंपरांशी आणि सांस्कृतिक वारशाशी पुन्हा जोडले जाण्यासाठी, समाजातील कुटुंबांमध्ये दृढ संबंध व नवीन संधी निर्माण करण्यासाठी, स्नेह, सहकार्य आणि आपुलकीची भावना अधिक घट्ट करण्यासाठी, एक संघटित, प्रगतीशील आणि आत्मनिर्भर समाज उभारण्याचा संकल्प करण्यासाठी तसेच भंडारी-भंडारी मुथा समाजाच्या सुवर्ण भविष्यात सहभागी होण्यासाठी हे संमेलन महत्वाचे आहे. संमेलनाची सुरुवात सकाळी ९ वाजता ब्रेकफास्ट (नाश्ता) आणि नोंदणीने होईल. कार्यक्रमास जितो अपेक्सचे अध्यक्ष विजय भंडारी, जिल्हा परिषदेचे सीईओ आनंद भंडारी, न्यायाधीश प्रितेश भंडारी, शासनाच्या जैन विकास महामंडळाचे समन्वयक संदीप भंडारी यांची प्रमुख उपस्थिती राहील. यानंतर सकाळी १० ते १०.३० यावेळेत कुलदेवी माता आशापुराजी यांची आरती, वंदना आणि दीपप्रज्वलन सोहळा पार पडेल. यानंतर उद्घाटन सत्रात अतिथींचे स्वागत व सत्कार केला जाईल. सकाळी ११ ते १ यावेळेत बेंगळुरू येथील सुप्रसिद्ध वक्ते, माईड सेट कोच राहुल कपूर जैन यांचे ''चरणस्पर्श'' या विषयावरील प्रेरणादायी व्याख्यान होईल.

## पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाची चळवळ राबविण्याचे आवाहन – सीईओ – पल्लवी विजयवंशी

### स्नेहबंधच्या पुढाकाराने पर्यावरण संवर्धनाचा संदेश



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धन व हरित अहिल्यानगरच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने छावणी परिषद कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी छावणी परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे तसेच छावणी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, स्वच्छता निरीक्षक गणेश भोर, इंजिनीअर अशोक फुलसुंदर, माजी वरिष्ठ स्वच्छता निरीक्षक रमेश साके, माजी प्राचार्य एकनाथ जगताप, योग प्रशिक्षक रामचंद्र लोखंडे आदी उपस्थित होते.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी पल्लवी विजयवंशी म्हणाल्या, ''वृक्षारोपण ही केवळ एक औपचारिकता नसून पर्यावरणाचे संवर्धन करण्याची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन केल्यास पर्यावरण संतुलन राखण्यास मोठी मदत होईल. अशा उपक्रमांमुळे समाजात पर्यावरणाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण होते.''

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, ''स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत विविध जनहिताचे उपक्रम राबविले जात आहेत. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनावरही भर देणे आवश्यक आहे. आगामी काळात अधिकाधिक वृक्षारोपण उपक्रम राबविण्याचा आमचा मानस आहे.''

कार्यक्रमाच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

## मराठा वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवतींना योग्य जीवनसाथी मिळावा, परस्पर संवाद वाढावा तसेच विवाह जुळवणीची प्रक्रिया अधिक सुलभ व्हावी या उद्देशाने स्वराज्य बहुउद्देशीय विकास संस्था संचलित स्वराज्य मराठा वधू-वर सूचक मंडळाच्या वतीने रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रीराम चौक, पाईपलाईन रोड, सावेडी येथील शिवतीर्थ, पहिला मजला, वनश्री बलभीमराव डोके कॉर्नर, संत नामदेव चौक येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा मेळावा होणार आहे. मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक–युवतींनी आपल्या पालकांसह या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

मेळाव्यात सहभागी होणाऱ्या युवक–युवतींनी बायोडाटा, दोन मोठ्या आकाराचे पूर्ण फोटो, पासपोर्ट साईज फोटो, आधारकार्ड तसेच पॅनकार्ड सोबत आणावेत. नोंदणी व परिचय प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

समाजातील युवक–युवतींना एकमेकांशी परिचय करून देण्यासाठी, संवादाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि विवाह जुळवणीसाठी विश्वासार्ह व्यासपीठ निर्माण करण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक–युवती व त्यांच्या पालकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वराज्य मराठा वधू–वर सूचक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

'वेळेचे भान, समाजाचा अभिमान' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## ढवळपुरीत श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व लोकार्पण सोहळा

### तीन दिवस भक्तीमय उत्सवाची पर्वणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथे ग्रामस्थांच्या लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या भव्य श्रीराम मंदिराचा मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा सोमवार, दि. २९ जून ते बुधवार, दि. १ जुलै २०२६ या कालावधीत मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. श्रीक्षेत्र दुर्गामातेच्या कुशीत वसलेल्या या पवित्र स्थळी तीन दिवस विविध धार्मिक विधी, यज्ञ, होम–हवन, कावड यात्रा, कीर्तनसेवा आणि प्राणप्रतिष्ठा सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर राममय होणार आहे.

बुधवार, दि. १ जुलै रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत महंत ह.भ.प. गुरुवर्य रामगिरीजी महाराज (मठाधिपती, सराला बेट, श्रीरामपूर) यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण व मंदिर लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

या भव्य धार्मिक सोहळ्यास राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. निलेश लंके, माजी खासदार सुजय विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते सर आमदार संग्राम जगताप,माजी सभापती राहुल झावरे पाटील, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, भाजप पारनेर तालुका अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, ढवळपुरीच्या लोकनियुक्त सरपंच नंदाताई गावडे, चेअरमन सुखदेव चितळकर, उद्योजक अंकुश चौधरी, डॉ. राजेश भनगडे, बाळासाहेब कुंभकर्ण, अनिलकुमार पोखरणा, ॲड. प्रशांत शिंदे (पुणे), उपसरपंच बबन पवार, डॉ. किरण लोंढे, प्रा. सुनिल फापाळे, चेअरमन भागाजी गावडे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरूर येथील पोखरणा उद्योग समूहाचे सुवालाल पोखरणा हे राहणार आहेत.

सोमवार, दि. २९ जून रोजी मंडप प्रवेश, मंडपपूजन, वास्तुशांती, ग्रामप्रदक्षिणा, गोपूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन तसेच विविध अधिवास विधी होणार आहेत. मंगळवार, दि. ३० जून रोजी गणेश पूजन, नवग्रह स्थापना, रुद्र, विष्णू व रामयाग, होम–हवन तसेच श्री दुर्गामातेची कावड यात्रा आयोजित करण्यात आली आहे. बुधवार, दि. १ जुलै रोजी कलश प्रतिष्ठापना, श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा, महापूजन, यज्ञ समारोप, कलश कुंभाभिषेक, मंदिर लोकार्पण आणि महाआरतीने सोहळ्याची सांगता होणार आहे. श्रीराम सेवाभावी संस्था, ग्रामपंचायत ढवळपुरी, मंदिर विश्वस्त मंडळ आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रीरामाच्या या ऐतिहासिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष संदीप थोरात, उपाध्यक्ष संतोष बुचडे, सचिव रमेश केदारी, खजिनदार मच्छिंद्र व्यवहारे तसेच विश्वस्त दत्तात्रय थोरात, पियुष कुंभकर्ण आणि संभाजी ढेकळे यांनी केले आहे. नव्याने उभारण्यात आलेले भव्य श्रीराम मंदिर हे ढवळपुरीच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वैभवात मोलाची भर घालणारे ठरणार असून, हा सोहळा गावाच्या इतिहासातील एक सुवर्णक्षण म्हणून कायम स्मरणात राहील.

## अहिल्यानगरात 'लता मंगेशकर, संगीताची सरस्वती' विषयावरील विशेष व्याख्यान व तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** महाराष्ट्र राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य तेलुगु साहित्य अकादमीच्या वतीने भारतरत्न स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर आधारित विशेष व्याख्यान आणि तेलुगू सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता नालेगाव येथील श्री मार्कंडेय संकुल, अमरधाम रोड, दातरंगे मळा येथे होणार आहे.

या कार्यक्रमात 'लता मंगेशकर, संगीताची सरस्वती' या गाजलेल्या पुस्तकाचे लेखक श''री कस्तुरी मुरलीकृष्ण'' यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले असून, लता मंगेशकर यांच्या संगीत कारकिर्दीचा, त्यांच्या संगीतातील योगदानाचा तसेच भारतीय संगीतविश्वावर त्यांनी उमटविलेल्या अमिट ठशाचा सखोल आढावा ते उपस्थितांसमोर तेलगु भाषेत मांडणार आहेत. याशिवाय तेलुगू संस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात येणार आहेत. या मध्ये भरतनाट्यम, बतकम्मा, कोलालू आणि मंगळा गौर या कला सादर होणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

कार्यक्रमाचे समन्वयक श्री अशोक कंटे यांनी सांगितले की, ''भारतरत्न लता मंगेशकर'' यांचे कार्य हे केवळ संगीत क्षेत्रापुरते मर्यादित नसून ते भारतीय संस्कृतीचा अमूल्य वारसा आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू जाणून घेण्याची ही सुवर्णसंधी आहे. तसेच तेलुगू संस्कृतीची समृद्ध परंपरा अनुभवण्याची संधीही या कार्यक्रमातून मिळणार आहे. तेलुगू भाषेतील व तेलुगू समाजातील साहित्य, संगीत आणि संस्कृतीप्रेमी नागरिकांनी तसेच तेलुगू समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,'' असे आवाहन स्थानिक समन्वयिका सौ सुरेखा भिमराज कोडम यांनी केले आहे.

सदर कार्यक्रमास प्रवेश पूर्णपणे विनामूल्य असून साहित्य, संगीत व सांस्कृतिक क्षेत्रातील रसिकांसाठी हा कार्यक्रम विशेष आकर्षण ठरणार आहे.

## भटक्या विमुक्त समाज संघटनेतर्फे राजर्षी शाहू महाराजांची जयंती साजरी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** रयतेचे राजे, सामाजिक न्यायाचे प्रणेते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती अहिल्यानगर शहर भटक्या विमुक्त समाज संघटनेच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले तसेच त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणकारी कार्याला उजाळा देण्यात आला.

प्रारंभी संघटनेचे शहर जिल्हाध्यक्ष यांच्या राजाभाऊ वाडेकर यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर भांगे, भाऊ वर्धेकर, निलेश चव्हाण यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव उपस्थित होते.

राजाभाऊ वाडेकर म्हणाले की, ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक समता, शिक्षण, आरक्षण, बहुजन कल्याण आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी केलेले कार्य आजही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळावा, शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली व्हावीत आणि जातीभेद नष्ट व्हावा यासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे.''

## सर्जेपुरा पोस्ट ऑफिसचे स्थलांतर रद्द करून पूर्वीच्या ठिकाणीच सुरू करण्याची मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी




**अहिल्यानगर–** शहरातील बागडपट्टी परिसरातील सर्जेपुरा पोस्ट ऑफिसचे कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक स्थलांतर करण्यात आल्याने ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच हजारो खातेदारांची मोठी गैरसोय होत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. हे पोस्ट ऑफिस पूर्वीच्या किंवा जवळच्या सोयीस्कर ठिकाणी पुन्हा सुरू करण्यात यावे, अशी मागणी ज्येष्ठ नागरिक अरुण लखपती यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सर्जेपुरा पोस्ट ऑफिस हे शहराच्या मध्यवर्ती भागात असल्याने परिसरातील नागरिकांना टपाल व बँकिंगसंबंधित व्यवहार करणे सोयीचे होते. मात्र दि. २० ते २१ जून २०२६ दरम्यान कोणतीही पूर्वसूचना किंवा माहितीफलक न लावता या पोस्ट ऑफिसचे स्थलांतर करण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, अनेकांना नवीन ठिकाणाची माहिती नसल्याने त्रास सहन करावा लागत आहे.

सदर पोस्ट ऑफिसमध्ये सुमारे १८ ते २० हजार खातेदार असून, त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक व महिलांची संख्या मोठी आहे. पोस्ट ऑफिस हेड पोस्ट ऑफिसमध्ये हलविल्यामुळे या सर्वांना अधिक अंतराचा प्रवास करावा लागत असून, त्यांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सर्जेपुरा पोस्ट ऑफिस पूर्वीप्रमाणेच जवळच्या व सोयीस्कर ठिकाणी पुन्हा सुरू करण्यात यावे, अशी मागणी अरुण लखपती यांनी प्रशासनाकडे केली आहे.

## स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात राज्यभरातील स्वच्छतागृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध करावी

### अहिल्यानगर ग्राहक पंचायतीची निवेदनाद्वारे मागणी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** कमहाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने काढलेल्या परिपत्रकानुसार महामंडळाच्या बस स्थानक परिसरातील सार्वजनिक शौचालये व स्नानगृहे प्रवाशांना मोफत उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करणारे पत्र ग्राहक पंचायत, महाराष्ट्राच्या अहिल्यानगर शाखेतर्फे शिष्टमंडळातर्फे अहिल्यानगर जिल्ह्याच्या विभागीय कार्यालयाला देण्यात आले. विभागीय कार्यालयाचे डिव्हीजनल कंट्रोलर यांच्या वतीने डीटीओ कमलेश भारती यांनी हे पत्र स्वीकारले व पुढील कार्यवाहीची ग्वाही दिली.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने एका परिपत्रकाद्वारे १ जून, २०२६पासून राज्यातील महामार्गावरून धावणाऱ्या सर्व बसेस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या तिकिटामध्ये २ रुपये स्वच्छता अधिभार लागू केला आहे या स्वच्छता अधिभाराच्या मोबदल्यात महामंडळाच्या बसस्थानक परिसरातील स्वच्छता गृहे प्रवाशांना वापरता येणार आहेत असेही महामंडळाने जाहीर केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

मात्र या परिपत्रकाची अंमलबजावणी विविध बस स्थानकांमध्ये होत नसल्याचे ग्राहक पंचायतीच्या जिल्हाभरातील पदाधिकारी व सदस्यांना आढळले त्यानुसार स्थानिक पदाधिकाऱ्यांनी श्री भारती यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली. तसेच यापूर्वीचे स्वच्छता ठेकेदार यांनी अद्यापही ही स्वच्छतागृहे आपल्या अधिपत्याखाली ठेवली असून ते अनाधिकृतपणे प्रवाशांकडून स्वच्छतागृह वसणार गृह वापराबद्दल शुल्क आकारक आहेत तसेच यासंदर्भात एसटी महामंडळाच्या अधिकारांकडे तक्रार केली असता ते त्याची दखल घेत नसल्याचेही शिष्टमंडळाने त्यांना सांगितले याबाबत तत्काळ कारवाई व्हावी अशी मागणी दिलेल्या पत्राद्वारे त्यांनी केली.

प्रवाशांना अद्यापही या बदलाची जाणीव नसल्याने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर या आशयाचे फलक दर्शनी भागात ठळक अक्षरात लावावे तसेच बस स्थानकावरील ध्वनिक्षेपकावरून झालेला हा बदल अर्थात बस स्थानक परिसरातील शौचालय व स्नानगृह प्रवाशांसाठी मोफत आहेत व त्यासाठी प्रवाशांनी कोणतेही शुल्क देऊ नये अशी सूचना दर पंधरा–वीस मिनिटांनी प्रसारित करावी अशी ही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनावर ग्राहक परिषदेचे अशासकीय सदस्य व ग्राहक पंचायती महाराष्ट्रच्या अहिल्यानगर शाखेचे जिल्हाध्यक्ष गजेंद्र क्षीरसागर, जिल्हा संघटक डॉ. प्रा. राजेंद्र कळमकर, जिल्हा सचिव एडवोकेट सिद्धार्थ वाघमारे सहसचिव संजय जोशी सदस्य अजित कटारिया यांच्यासह आहेत. या निवेदनासाठी ग्राहक पंचायत महाराष्ट्र नाशिक विभागीय पदाधिकारी दत्तात्रेय शेळके, व अहिल्यानगरचे जिल्हा कोष प्रमुख कृष्णराव बागडे यांचे सहकार्य लाभले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल: dainikaakarshan@gmail.com. (✻ पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### १ जुलै रोजी अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पालखी सोहळाचे अहिल्यानगरमध्ये आगमन



अहिल्यानगर - श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पालखी पादुका परिक्रमा,महाराष्ट्र परिक्रमेचे २९ वे वर्ष आहे. सालाबाद प्रमाणे १जुलै २०२६रोजी कल्याण रोड येथील समाधान नगर,आनंद पार्क ,शांताई बंगला, ढोरे परिवार येथे श्री स्वामी समर्थ पालखी सोहळ्याचे आगमन सकाळी ११.०० वा.होणार आहे. ११:३०वाजता महाआरती स्वामी भक्तांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे (भंडारा)वाटप करण्यात येणार आहे.या धार्मिक सोहळ्यासाठी व श्री स्वामी समर्थ पालखी व पादुका मुक्कामी असल्याने स्वामी भक्तांना दर्शनासाठी दिवस भर व्यवस्था करण्यात आली आहे.तरी अहिल्यानगर येथील स्वामी भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा. असे आवाहन ढोरे परिवाराने केले आहे. २जुलै रोजी २०२६ रोजी सकाळी ६:३० वाजता अभिषेक करण्यात येणार आहे.तसेच पालखीचे प्रस्थान सकाळी ९:०० वाजता होणार आहे. अशी माहिती शांती ऑडिओ चे राजु ढोरे यांनी दिली आहे.

### २८ जून रोजी सतलोक आश्रम ढवळपुरी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन



अहिल्यानगर- पारनेर तालुक्यातील सतलोक आश्रम ढवळपुरी येथे संत रामपाल जी महाराज यांच्या पावन सानिध्यात परमेश्वर कबीर साहेब यांच्या ६२९ प्रकट दिनानिमित्त मुनिंदर धर्मार्थ ट्रस्ट सतलोक आश्रम यांच्या वतीने विशाल भंडारा, संत गरीब दास जी महाराज यांच्या अमरवाणीचे अखंड पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. संत रामपाल जी महाराज यांचा मुख्य उद्देश समाजातील जातीपातीचा भेद दूर करणे, तरुणांची व्यसनमुक्ती करणे, हुंडा मुक्त विवाह करणे, समाजात बंधुभाव व शांतता प्रस्थापित करणे.समाजातील हुंडा सारख्या कु प्रथा बंद करणे हा आहे.या सोबतच हुंडा मुक्त विवाह व रक्तदान शिबिराचे आयोजन २८ जून रोजी सकाळी आठ ते सायंकाळी पाच या वेळेमध्ये रक्तदान शिबिर होणार आहे.या रक्तदानाच्या महान कार्यात सहभागी होऊन रक्तदान करावे. असे आवाहन सतलोक आश्रम ढवळपुरी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### फसवणुकीच्या खाजगी फौजदारी खटल्यात महिलेस ६ महिने कैद व नुकसान भरपाईची शिक्षा

अहिल्यानगर - उसनवारी रक्कम घेतलेल्या परत फेडीपोटी दिलेला धनादेश न वटल्याच्या फसवणुकीच्या खटल्यात आरोपी श्रीमती जमनाबाई मंगल परमार (रा. गांधी ऑईल मिलजवळ, रेल्वे स्टेशन, अहमदनगर) यांचेवर इं. पि. को. कलम ४२० अन्वये फौजदारी गुन्हा सिध्द झाल्यामुळे अहमदनगर येथील अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. ९ यांनी आरोपीस दोषी धरुन ६ महिने साधी कैद व रक्कम रु. ७,८६,५००/- (अक्षरी रुपये सातलाख शहाऐंन्सी हजार पाचशे मात्र) नुकसान भरपाई पोटी फिर्यादीस देण्याची शिक्षा सुनावली. सदर खटल्याची थोडक्यात हकिगत अशी की, भिंगार येथील ओंकार सुपर मार्केटचे संचालक पद्माकर रमेश हरबा (रा. पाटील गल्ली, भिंगार अहमदनगर) यांचेकडुन सन २०१५ मध्ये वैद्यकीय उपचारासाठी श्रीमती जमनाबाई मंगल परमार यांनी रक्कम रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख मात्र) उसनवार घेतलेली होती. त्या बदल्यात नोटरी पब्लीक, अहमदनगर यांचेसमोर उसनवार पावती देखील लिहुन दिलेली होती. सदरची रक्कम फिर्यादीस १ ते सव्वा वर्षात परतफेड करण्याचे आश्वासन दिले होते. परंतु सदर मुदत उलटुन गेल्यानंतरही त्यांनी सदर रक्कम परत केली नाही.

## ज्ञानाचा दिवा प्रत्येक घरात; ज्ञानरचना सोशल फाउंडेशनकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत अधिकार असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, या सामाजिक बांधिलकीतून कार्यरत असलेल्या ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या वतीने पारनेर तालुक्यातील लोणी मावळा येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांना वर्षभरासाठी आवश्यक शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत तीस विद्यार्थ्यांना वह्या, दप्तर, कंपास बॉक्स तसेच इतर आवश्यक शैक्षणिक साहित्य देण्यात आले.

कार्यक्रमात ज्ञानरचना सोशल फाउंडेशनच्या संचालिका सौ.सुप्रिया मावळे चौधरी व सारिका मावळे यांच्या मातोश्री सुनंदा गौतम मावळे यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेच्या संचालिका सौ सुप्रिया मावळे चौधरी संचालक प्रविण साळवे, भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नानाभाऊ मावळे, सचिव नवनाथ शेंडकर, ज्येष्ठ पत्रकार सुरेश खोसे पाटील , मुख्याध्यापक मच्छिंद्र राऊत, विकास शेंडकर, बाबासाहेब दौंड, संतोष झरेकर, बाबाजी मावळे, बाळासाहेब मापारी, हरिभाऊ जाधव, रघुनाथ पवार, सौ. गुंड, अमृता लोंढे, आदिनाथ वाघ, विजय लाळगे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात संस्थेचे संचालक प्रविण साळवे यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, ज्ञानरचना सोशल फाउंडेशनची स्थापना २०२३ मध्ये करण्यात आली असून सौ. सुप्रिया मावळे चौधरी, सारिका मावळे आणि प्रविण साळवे यांच्या पुढाकारातून भारत सरकारकडे सेक्शन-८ कंपनी म्हणून संस्थेची नोंदणी करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक उन्नती हे ध्येय समोर ठेवून संस्था विविध सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम सातत्याने राबवत आहे.

संस्थेच्या माध्यमातून एज्युकेशनल मटेरियल बँक, सामाजिक संस्थांसाठी क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यशाळा, दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी सर्पदंश व त्यावरील उपाययोजना विषयक जनजागृती कार्यक्रम, ग्रामीण महिलांसाठी शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्र, तसेच सामाजिक, व्यावसायिक आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव सोहळा अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी बोलताना सुप्रिया चौधरी यांनी सांगितले की, शिक्षण हीच खरी समाज परिवर्तनाची ताकद आहे, यावर आमचा दृढ विश्वास आहे.

## प्रभाग क्रमांक एकमध्ये रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन

**मनपा प्रभाग क्रमांक एकला विकासकामांतून 'विकसित प्रभाग' म्हणून ओळख : किरण संपत बारस्कर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील प्रभाग क्रमांक एक हा शहरातील नव्याने विकसित होत असलेला भाग असून आमदार संग्राम जगताप व महापालिकेच्या माध्यमातून या परिसरातील मूलभूत प्रश्न सोडवून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने या भागात वास्तव्यास येत आहेत. नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लागल्यामुळे तीच कामे पुन्हा पुन्हा करण्याची वेळ येत नाही. पाणीपुरवठा, स्वच्छता, हरित प्रभाग निर्मिती, भूमिगत ड्रेनेज लाईन, पिण्याच्या पाण्याच्या लाईन्स, स्ट्रीट लाईट आदी प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येत आहेत. त्याचबरोबर धार्मिक कार्यक्रमांसाठी मंदिर परिसरात शेड व सांस्कृतिक हॉलची निर्मिती करण्यात आली असून त्यामुळे नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करत आहेत. या माध्यमातून समाजामध्ये ऋणानुबंध अधिक दृढ होत असल्याचे प्रतिपादन किरण संपत बारस्कर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांच्या प्रयत्नातून प्रभाग क्रमांक एकमधील जय मंगल नगरी, यश रो हाऊसिंग आणि अरोमा पार्क परिसरातील रस्ता काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन उत्साहात संपन्न झाले. यावेळी किरण संपत बारस्कर, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, संगीता अकोलकर, अर्पणा पालवे, रेणुका भालेराव, रेणुका शर्मा, रत्नमाला पाटील, डॉ. प्रवीण गायकवाड, गणेश शिंदे, प्रमोद चिंचणकर, योगेश एरंडे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, प्रभाग क्रमांक एकमधील विविध कॉलनींना एकमेकांशी जोडणाऱ्या अंतर्गत रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे नागरिकांच्या दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे. गेल्या दहा वर्षांमध्ये आमदार संग्राम जगताप आणि नगरसेवक संपत बारस्कर यांच्या माध्यमातून प्रभागात मोठ्या प्रमाणात विकासकामे पूर्ण झाली आहेत. नागरिकांनीदेखील चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे. या भागात पूर्वी कोणतीही ठोस विकासकामे नव्हती, मात्र ती आता पूर्णत्वास नेण्यात आली आहेत.

ते पुढे म्हणाले की, भिस्तबाग महालाच्या सुशोभीकरणाचे काम सध्या सुरू असून भविष्यात या ठिकाणाची शहरातील एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून ओळख निर्माण होईल. या परिसरात मोठ्या संख्येने नागरिक आणि पर्यटक भेट देण्यासाठी येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी जय मंगल नगरी, यश रो हाऊसिंग व अरोमा पार्क परिसरातील नागरिकांनी रस्ता काँक्रिटीकरणासह विविध विकासकामे पूर्ण केल्याबद्दल नगरसेवकांचे आभार मानले आणि विकासकामांचे स्वागत केले. परिसरातील नागरिकांनी या विकासकामांमुळे दळणवळण, स्वच्छता आणि नागरी सुविधांमध्ये मोठी सुधारणा झाल्याची भावना व्यक्त करत पुढील विकासकामांसाठीही सहकार्य करण्याची ग्वाही दिली.

## जिल्हा वाचनालयाच्या वतीने मोडक यांना आदरांजली



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष शिरीष दामोदर मोडक यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना आदरांजली वाहण्यासाठी वाचनालयाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते.

मोडक सरांच्या मार्गदर्शनानुसार वाचनालयाचे कार्य अविरतपणे पुढे चालू ठेवण्यात येईल असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. सभेचे अध्यक्षस्थानी वाचनालयाच्या ज्येष्ठ संचालिका प्रा. मेधाताई काळे होत्या. उपाध्यक्ष दिलीप पांढरे,प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, खजिनदार तनवीर खान, सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर, संचालिका शिल्पा रसाळ, प्रा . ज्योती कुलकर्णी, राहुल तांबोळी, किरण आगरवाल,संजय चोपडा,अनिल लोखंडे,ग्रंथपाल अमोल इथापे, उपग्रंथपाल नितीन भारताल उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ व्यंगचित्रकार वसंतराव विटणकर, भरतभाई शहा, श्री पाठक डॉ. विजय जोशी, गौरी जोशी,आनंद कुलकर्णी सुरेश मैड यांनी मोडक सरांच्या स्मृतींना उजाळा दिला .

श्री विक्रम राठोड म्हणाले की, वाचनालयाबरोबरच माझ्या वैयक्तिक आयुष्यात देखील मोडक सरांचे मार्गदर्शन माझ्यासाठी मोलाचे होते. त्यांच्या निधनाने वाचनालयाची हनी झाली आहे.

## आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या एनआयसीयू विभागात नवजात बालकांसाठी सर्व अद्यावत सेवा उपलब्ध – डॉ. निखिलकुमार गुट्टे

**आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये बालकांची मोफत आरोग्य तपासणी; ५५ बालकांची मोफत तपासणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** लहान बालकांच्या आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वीत असून, तज्ञ व अनुभवी डॉक्टरांची टीम सेवा देत आहे. २६ बेडच्या अद्यावत एनआयसीयू विभागात नवजात बाळाच्या विविध आजारावर सर्व अद्यावत सेवा उपलब्ध असून, हे सेंटर जिल्ह्यातील बालकांसाठी संजीवनी ठरत असल्याचे प्रतिपादन नवजात शिशू व बालरोग तज्ज्ञ डॉ. निखिलकुमार गुट्टे यांनी केले.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग तपासणी शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी डॉ. गुट्टे बोलत होते. यावेळी संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, डॉ. प्रकाश कांकरिया, बाबुशेठ लोढा, अभय गुगळे, माणकशेठ कटारिया, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ. आशिष भंडारी, पेडियाट्रीक सर्जन डॉ. रूपेश सिकची, बालरोग तज्ज्ञ डॉ. वैभवी वंजारे, डॉ. दिपी अग्रवाल, डॉ. लिझा बलसारा आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. गुट्टे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी.एस. (श्वसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार, जन्मजात आजारांचे निदान व उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब व डायलिसिस मशीन द्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

बालरोग तज्ञ डॉ. वैभवी वंजारे म्हणाल्या की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या माध्यमातून नवजात बालकांपासून लहान मुलांच्या सर्व शस्त्रक्रिया यशस्वी केल्या जात आहे. प्रदीर्घ अनुभवी डॉक्टर पूर्णवेळ हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहे. या शस्त्रक्रिया सवलतीच्या दरात केल्या जात असून, महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत लाभ देखील लाभार्थींना दिला जात आहे. तसेच नवजात बालकांना शासकीय लसीकरण व्यतिरिक्त इतर महाग असलेले लसीकरण अल्पदरात ना नफा, ना तोटा या तत्त्वावर उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

## महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत बालवाडी विभागाने केले अनोखे स्वागत

**मुलांचे स्वागत फुलांच्या वर्षावाने, मुलांच्या हस्ते हवेत फुगे सोडले, विद्यार्थ्याकरीता जोकर आणि डोनाल्ट डक रंगीबेरंगी फुग्याचे तोरण, रांगोळ्या**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** लालटाकी रस्त्यावरील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत पूर्वप्राथमिक (बालवाडी) विभागातील मुलांचे स्वागतानिमित्त मुलांच्या हस्ते हवेत फुगे सोडून स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्याकरीता रंगीबेरंगी फुग्याचे तोरण,रांगोळया काढण्यात आल्या होत्या. या कार्यक्रमास संस्थेच्या खजिनदार ॲड दिपलक्ष्मी म्हसे,शाळा समिती सदस्या सौ कल्पना वायकर , माजी मुख्याध्यापक सुरेश शेवाळे, माजी मुख्याध्यापिका अर्चना गिरी,मुख्याध्यापिका सुनिता शेवाळे,बालवाडी विभागप्रमुख सौ.लता मोढवे आदी मान्यवर उपस्थित होते. मुलांकरीता एक अनोखी संकल्पनेतून मुलाकरीता काही तरी नवीन देण्याच्या उददेश्याने जोकर आणि डोनाल्ट डक यांना शाळेत आणले होते त्यामुळे छोटे मुल रडण्याचे जणू काही विसरले होते. मुलांचे स्वागत शिक्षकांनी मुलांच्या अंगावर फुलांचा वर्षाव करत केले.

ॲड दिपलक्ष्मी म्हसे म्हणाल्या की, शिक्षक हे मुलांचे उदयाचे भविष्य घडवत असतात आनंददायी तसेच हसतखेळत शिक्षण महत्वाचे ते या शाळेच्या माध्यमातून मिळते मुलांच्या सर्वांगीण विकासाकरता शिक्षकाइतकीच पालकांचीही जबाबदारी आहे. मुलांनी आनंदादायी वातावरणात हसत-खेळत अभ्यास करा शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी, प्रगतीसाठी उपक्रमशील म्हणून नावारूपाला आली आहे.बौध्दीक विकासाबरोबर शारीरीक विकाससुध्दा केला जातो नवीन शैक्षणिक वर्षात 'शाळा पुन्हा एकदा सज्ज झालेली आहे.आपल्या पाल्याची काळजी शाळेतील सर्व कर्मचारी व अधिकारी, पदाधिकारी घेतील अशी ग्वाही दिली.

कल्पना वायकर म्हणाल्या की,बालवाडी हा मुलांच्या आयुष्यात महत्वाचा पाया असतो त्यांच्या जडणघडणीत तो महत्वाची भुमिका बजावतो त्यामुळे शिक्षकाइतकेच पालकांनी लक्ष दयायला हवे टिव्ही,मोबाईल याचा पालकांनी त्याग करावा तरच तुम्ही मुलांना वेळ देउ शकाल.

सुनिता शेवाळे म्हणाल्या की,शाळेच्या माध्यमातून नेहमीच काही तरी वेगळे देण्याचे काम आम्ही नेहमी करत असतो मुलांचा व पालकाच्या चेहऱ्यावरचा आनंद हा फार महत्वाचा आहे तो या माध्यमातून नक्कीच मिळतो घरातील आई आणि शाळेतील आई (शिक्षिका) यांचा हात धरून आपला पाल्य सुसंस्कारीत नागरिक घडेल आजचा दिवस आमच्यासाठी अत्यंत खास आहे. कारण आपल्या शाळेच्या जीवनात नवीन फुलांच्या रूपात ही छोटीछोटी मुल पहिल्यांदाच प्रवेश करत आहेत.इथे खेळता खेळता शिकायचं आहे गोष्टी ऐकायच्या आहेत गाणी म्हणायची आहेत आणि एकमेकांशी मैत्री करायची शिक्षणाच्या पहिल्या महत्वाच्या टप्प्यात त्यांना सुरक्षित आनंददायी आणि प्रेमळ वातावरण देण्यासाठी कटीबध्द आहोत.

## नांदूर पठार येथे सेंट्रल बँकेच्या मिनी शाखेचे उद्घाटन उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** ग्रामीण भागातील नागरिकांना बँकिंग सेवा सुलभ व्हावी या उद्देशाने नांदूर पठार येथे सेंट्रल बँकेच्या मिनी शाखेचे उद्घाटन उत्साहात पार पडले. या शाखेचे उद्घाटन परभणी जिल्हा परिषद सदस्य तथा नांदूर पठारचे सुपुत्र भरतदादा घनदाट आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दीपक अण्णा लंके यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

यावेळी टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते रवींद्र राजदेव, सरपंच संदीप चौधरी, उपसरपंच सुनील राजदेव, माजी सरपंच भानुदास आग्रे, हरीभाऊ आहेर, नवनाथ पाटील घोलप, दत्तात्रय देशमाने, मारुती आग्रे, पंढरी आग्रे, ज्ञानदेव लक्ष्मण चौधरी, विलास महाराज आहेर, राजेंद्र राजदेव, रामदास राजदेव, बबन घोलप, स्वप्नील राजदेव, बाबाजी चौधरी, ग्रामसेवक रामदास सांगळे, प्रकाश राजदेव, संतोष घनदाट, रामलाल राजदेव, नवनाथ आहेर, रवींद्र चौधरी, शुभम आहेर, शिवाजी महाराज आग्रे, दादा पाटील राजदेव, मोहन राजदेव, रामदास चौधरी, ज्ञानदेव श्रीपती चौधरी, भगवंत हाढवळे, राजाराम राजदेव, मंगेश आहिले, अमोल गाडगे, सागर शिरतार यांच्यासह विकास विद्यालय व प्राथमिक शाळेचे शिक्षक-विद्यार्थी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना भरतदादा घनदाट यांनी नांदूर पठार गावात झालेल्या विकासकामांचे कौतुक करत ग्रामीण भागात बँकिंग सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल संबंधितांचे आभार मानले. तर दीपक अण्णा लंके यांनी नांदूर पठारच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

ग्रामीण नागरिकांना आता विविध बँकिंग सेवा गावातच उपलब्ध होणार असल्याने ग्रामस्थांनी या नव्या मिनी शाखेच्या उद्घाटनाचे स्वागत केले असून, या सुविधेमुळे आर्थिक व्यवहार अधिक सुलभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# डॉ.पाऊलबुद्धे फार्मसीचे नशामुक्त भारत अभियान

## जनजागृती रॅलीत जिल्हाधिकारी यांची उपस्थिती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर मधील वसंत टेकडी येथील डॉ.एन.जे. पाऊलबुद्धे फार्मसी महाविद्यालयातर्फे नशामुक्त भारत अभियान अंतर्गत समाजामध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मंगळवार दि.३० जून २०२६ रोजी सकाळी ७ ते ९ या वेळेत भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले असून या रॅलीमध्ये जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया उपस्थित राहणार आहेत.

ही रॅली श्रीराम चौक ते डी–मार्ट या मार्गावर आयोजित करण्यात येणार असून, राष्ट्रीय सेवा योजना (), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ तसेच समाजकल्याण विभाग, अहिल्यानगर जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने हा जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे.या रॅलीचे उद्देश स्पष्ट करताना प्राचार्य डॉ. श्याम पंगा यांनी सांगितले की, सध्याच्या काळात युवकांमध्ये वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या सेवनामुळे निर्माण होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम अत्यंत चिंताजनक आहेत. या पार्श्वभूमीवर युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण करून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ‘‘नशा सोडा जीवन जोडा‘‘ हा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख हेतू आहे असे ते म्हणाले.

या जनजागृती रॅलीसाठी भंडारी क्लॉथ स्टोअर्स, अनंत कलेक्शन, बुधवंत स्किन केअर क्लिनिक, भारत केमिकल्स, सौरभ ट्रॅव्हल्स आणि ऑस्टिऑन हॉस्पिटल यांचे मोलाचे सहकार्य व प्रायोजकत्व लाभले आहे.

या उपक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्याचे मा.जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले असून, त्यांनी या सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण असलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले असून या रॅलीसाठी आपण आवर्जून उपस्थित राहणार असल्याचे सांगितले. या उपक्रमात पोलीस अधीक्षक श्री.मुम्मका सुदर्शन, समाजकल्याण अधिकारी श्री. देविदास कोकाटे तसेच राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जिल्हा समन्वयक श्री.गणेश निमसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या सर्व मान्यवरांना फार्मसी कॉलेजच्या वतीने निमंत्रण देण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ.श्याम पंगा प्राचार्य अनुराधा चव्हाण, डॉ. वेणु कोला, डॉ. विजय तारडे डॉ. रोशनी सूर्यवंशी, स्वाती कडूनोर उपस्थित होते. या उपक्रमात सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सर्व शैक्षणिक शाखांतील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी या जनजागृती रॅलीमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविणार असून, व्यसनमुक्त भारताचा संदेश समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी एकजुटीने सहभागी होणार आहेत.

महाविद्यालयातर्फे सर्व विद्यार्थी, युवक, नागरिक, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक संघटनांनी या जनजागृती रॅलीमध्ये सहभागी होऊन व्यसनमुक्त, सुदृढ आणि निरोगी समाजाच्या निर्मितीस हातभार लावावा, असे आवाहन फार्मसीच्या महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# जितो राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अहिल्यानगर चॅप्टरच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) यांच्या वतीने चेन्नई येथे जितो राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा २०२६ नुकत्याच घेण्यात आल्या. बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, बुद्धिबळ, ॲथलेटिक्स, जलतरण यांसारख्या विविध क्रीडा प्रकारांचा यात समावेश होता. स्पर्धेत जितो अहिल्यानगर चॅप्टरचे प्रतिनिधित्व करत नगरच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी अहिल्यानगरमधील विविध भागांतून खेळाडूंची निवड प्रक्रिया राबविण्यात आली. अंतिम निवडीअंती जितोअहिल्यानगर चॅप्टरतर्फे अंश चोरडिया, नामित फिरोदिया, ऋषभ भन्साळी, नक्ष गांधी, मीत दुधेडिया, चिराग दुधेडिया, जिनम संकलेचा, मोहित गांधी, पुरब गांधी, तिर्थेश चोरडिया आणि अर्हम कर्नावट यांनी राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत नक्ष गांधी यांनी बुद्धिबळामध्ये रौप्य पदक मिळवत उत्कृष्ट कामगिरी केली, तर अंश चोरडिया यांनी टेबल टेनिसमध्ये कांस्य पदक पटकावून जितो अहिल्यानगर चॅप्टरचा गौरव वाढवला.

या खेळाडूंना जितो अहिल्यानगर चॅप्टरचे अध्यक्ष अलोक मुनोत, मुख्य सचिव तुषार कर्नावट, सल्लागार कमिटी सदस्य अमित मुथा, विजय गुगळे, क्रीडा विभागाचे संयोजक अभिनंदन भन्साळी, सहसंयोजक हर्षद कर्नावट यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि सतत सहकार्य लाभले. त्यांच्या प्रयत्नांमुळे खेळाडूंमध्ये आत्मविश्वास व स्पर्धात्मक ऊर्जा निर्माण झाली. या टिमचे व्यवस्थापक यश कासलीवाल होते.

जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन नेहमीच विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला जोडण्याचे कार्य करते. जितो स्पोर्ट्स हे असेच एक व्यासपीठ आहे, जिथे खेळाडूंना आपली प्रतिभा सादर करून राष्ट्रीय स्तरावर खेळण्याची संधी मिळते. या खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य व प्रोत्साहन जितो कडून सातत्याने दिले जाते.

# पारुंडी येथे कापूस लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण

## शेतकरी गटांना मिळणार शासकीय अनुदान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण तालुक्यातील पारुंडी येथे कृषी विभागाच्या वतीने ‘कापूस विकास कार्यक्रम’ अंतर्गत कापूस लागवडीसंदर्भातील आधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले.

शेतकऱ्यांना कमी अंतरावरील कापूस लागवड, सुधारित वाणांची निवड, खत व पाणी व्यवस्थापन, तसेच कीड नियंत्रणाबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच दत्ताभाऊ दौंड होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपकृषी अधिकारी अशोक पठाडे यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून कापूस उत्पादनात वाढ करण्याचे आवाहन केले. शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्याचेही त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, मंडळ कृषी अधिकारी संदीप नाईक, कृषी सहाय्यक आणि उपकृषी अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षणाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले. या गावांतील शेतकरी गटांना मिळणार अनुदान कापूस विकास कार्यक्रमांतर्गत पारुंडी, तुपेवाडी, गेवराई खुर्द, सुलतानपूर आदी गावांतील पात्र शेतकरी गटांना कमी अंतरावरील कापूस लागवडीसाठी शासनाकडून विशेष अनुदान देण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

प्रशिक्षणामुळे परिसरातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून उत्पादनवाढीस चालना मिळणार असल्याचा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त केडगावात शाहू विचारांचा जागर

## ११० गरजू विद्यार्थिनींना गणवेश व शैक्षणिक साहित्याचे वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची जयंती आणि सामाजिक न्याय दिन विविध समाजोपयोगी उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक समता, शिक्षण, स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर शाहू विचारांनी दुमदुमून गेला.

यावेळी विद्यालयाच्या वतीने केडगाव ते शाहूनगर परिसरात भव्य जनजागृती मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थिनींनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मावळे आदींची वेशभूषा परिधान करून आकर्षक जिवंत देखावे सादर केले. ‘‘राजर्षी शाहू महाराजांचा विजय असो,सामाजिक न्याय दिनाचा विजय असो,झाडे लावा, झाडे जगवा,प्लास्टिकचा वापर टाळा,मुले–मुली एकसमान, दोघांनाही शिकवा छान तसेच स्वच्छता पाळा, रोगराई टाळा अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन विद्यार्थिनींनी परिसरात जनजागृती केली.

सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाच्या वतीने ११० गरजू विद्यार्थिनींना शालेय गणवेश, बूट व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थिनींचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याच कार्यक्रमात विद्यालयाच्या प्राचार्या वासंती धुमाळ यांना ‘आदर्श शिक्षक पुरस्कार’ प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रमेश बजाबा गवळी होते. प्रमुख पाहुणे म्हणून कायझेन अकॅडमीचे संचालक, व्याख्याते व समुपदेशक महेश डाळिम्बकर उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना महेश डाळिम्बकर म्हणाले, ‘‘राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक परिवर्तनाचे कार्य आणि विचार भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे मोठे महत्त्व आहे. शिक्षण म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नसून योग्य निर्णयक्षमता, सामाजिक जबाबदारी आणि मानवी मूल्यांची जाणीव करून देणारी प्रक्रिया आहे. डिजिटल युगात ऑनलाइन शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत; मात्र त्याचा सुजाण व मर्यादित वापर होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी ज्ञानाबरोबरच संस्कार, सामाजिक भान आणि मानवी मूल्येही आत्मसात करण्याचे त्यांनी आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात रमेश गवळी म्हणाले, दूरदृष्टी, सामाजिक समता आणि शिक्षणाचा प्रसार करणारे लोककल्याणकारी राजे म्हणजे छत्रपती राजर्षी शाहू महाराज. समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत त्यांनी सामाजिक परिवर्तनाची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करून त्यांचे विचार समाजात रुजविणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार असल्याचे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नामदेव वायळ यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय संजयकुमार निक्रड यांनी करून दिला. राजश्री पालवे यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनकार्याचा प्रेरणादायी परिचय उपस्थितांना करून दिला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष भास्कर जासूद, सचिव बबन कोतकर ,सहसचिव रावसाहेब सातपुते, खजिनदार प्रल्हाद साठे, कार्यकारी संचालक जयद्रथ खाकाळ, संचालक दगडू साळवे, जयश्री कोतकर, नगरसेविका वर्षा काकडे, माजी शिक्षक राजेश सोनवणे, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रेणुका म्हस्के, प्राचार्या वासंती धुमाळ देणगीदार, पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन जालिंदर सातपुते व छाया सुंबे यांनी केले. सूत्रसंचालन समृद्धी लटके व छाया सुंबे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्राचार्या वासंती धुमाळ यांनी मानले.

# खडांबे येथीलश्री शाहू विद्या मंदिरात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री शाहू विद्या मंदिर, खडांबे येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व दिमाखदार वातावरणात साजरी करण्यात आली. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी अशोकराव उंडे साहेब (उंडे नर्सरी संचालक), कृषिभूषण सुरसिंगराव पवार, बाळासाहेब लटक (माजी उपसभापती पंचायत समिती), यशवंत ताकटे (माजी सरपंच), श्यामराव खेसम्हाळसकर (माजी सरपंच), इंजि. मच्छिंद्र सोनवणे, बाळासाहेब जठार, अनशाबापू आवारे (ग्रामपंचायत सदस्य), भाऊसाहेब खळेकर (माजी मुख्याध्यापक), अर्जुनराव खळेकर (माजी उपसरपंच), केरू कल्हापुरे, गुलाबराव पवार, बाळासाहेब कल्हापुरे, भानुदास कल्हापुरे, दादा पाटील काचोळे, उपसरपंच अमोल हरिश्चंद्रे तसेच अनिल कल्हापुरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्य, सामाजिक सुधारणा आणि शैक्षणिक क्रांतीवर आधारित भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य आप्पासाहेब शिंदे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. सर्व समाजघटकांना शिक्षणाची समान संधी मिळावी यासाठी त्यांनी अनेक लोकहितकारी निर्णय घेतले. विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा आणि समाजाचा विकास साधावा,’’ असे आवाहन त्यांनी केले.

## सभासदांना ९ टक्के लाभांश द्या

# माध्यमिक शिक्षक सोसायटीकडे शिक्षक सभासदांची मागणी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या आर्थिक नियोजनात सभासदांच्या हिताला प्राधान्य देऊन नवीन जागा खरेदीसाठी करण्यात आलेली तरतूद, ऑनलाईन सुविधांसाठी राखून ठेवलेला निधी तसेच ऑडीट शुल्कातील बचत यांचा उपयोग सभासदांना अधिक लाभांश देण्यासाठी करावा, अशी मागणी शिक्षक सभासदांनी केली आहे. यासोबतच यंदा जाहीर करण्यात आलेल्या ८ टक्के लाभांशामध्ये आणखी १ टक्का वाढ करून एकूण ९ टक्के लाभांश देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यासंदर्भातील निवेदन माध्यमिक शिक्षक सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांना देण्यात आले. यावेळी वैभव सांगळे, अरुण इघे, अविनाश साठे, सुशिल नन्नवरे, अमोल शिंदे, सौ. शिंदे यांच्यासह अनेक शिक्षक सभासद उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, माध्यमिक शिक्षक सोसायटीत नुकतेच सत्ता परिवर्तन झाले आहे. मागील वर्षी सभासदांना ६ टक्के लाभांश देण्यात आला होता. तो लाभांश तत्कालीन सत्ताधाऱ्यांच्या कार्यकाळातील आर्थिक कारभारावर आधारित असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, यंदा नव्या व्यवस्थापनाच्या कार्यकाळात ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला असला तरी तो वाढवून ९ टक्के करावा, अशी सभासदांची भूमिका आहे.

सभासदांनी वार्षिक अहवालाचा दाखला देत सांगितले की, संस्थेने नवीन जागा खरेदीसाठी २५ लाख रुपये आणि ऑनलाईन सुविधा उभारणीसाठी आणखी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. सध्या या निधीचा खर्च टाळून तसेच ऑडीट फीमध्ये कपात करून वाचणारी रक्कम सभासदांच्या हितासाठी वापरावी. त्यातून प्रत्येक सभासदाला सुमारे दीड ते दोन हजार रुपयांचा अतिरिक्त लाभ मिळू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय सोसायटीची आर्थिक स्थिती अधिक सक्षम करण्यासाठी थकीत कर्जवसुलीवर विशेष भर देऊन एनपीए (बुडीत कर्जे) वाढणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. तसेच प्रवास खर्च, रंगकाम, कृतज्ञता निधी, विविध समारंभांवरील खर्च यामध्ये काटकसर करून आर्थिक शिस्त राखण्याची आवश्यकता सभासदांनी व्यक्त केली. निवेदनात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित करत, मुख्य शाखेची आवश्यक परवानगी मिळाल्याशिवाय तिसऱ्या मजल्याचे बांधकाम सुरू करू नये, तसेच संस्थेची आर्थिक स्थिती अधिक सक्षम झाल्यानंतरच अशा मोठ्या विकासकामांचा विचार करावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

(पान १ वरून)

## आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा - महापौर ज्योतीताई गाडे

हातात झाडू घेऊन परिसराची स्वच्छता करत अभियानाची सुरुवात केली. यावेळी महापालिका आयुक्त यशवंत डांगे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी उपमहापौर गणेश भोसले, प्रा. माणिकराव विधाते, नगरसेवक सुरेश बनसोडे, महेश तवले, मयूर बांगरे, प्रकाश भागानगरे, रेवन्नाथ पवार, गोरख पडोळे, सुरज कोतकर, जॉय लोखंडे, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ, सुरज शिंदे, नितीन घोडके, तुषार यादव, मारुती पवार, भाऊ बारस्कर, सचिन पवार, रवी दंडी आदी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.
यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात व्यापक स्वच्छता मोहीम सुरू करण्यात आली आहे. संत गाडगेबाबा यांनी गावोगावी फिरून कीर्तनाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश दिला आणि स्वतः हातात झाडू घेऊन गाव स्वच्छ करण्याचे कार्य केले. त्यांच्या विचारांचा आदर्श घेऊन नागरिकांनी स्वच्छतेबाबत पुढाकार घ्यावा. प्रत्येकाने आपला कचरा घंटागाडीतच टाकावा. काही नागरिक रस्त्याच्या कडेला कचरा टाकून कचऱ्याचे ढीग निर्माण करतात, ही प्रवृत्ती थांबली पाहिजे. आपले शहर कचराकुंडीमुक्त झाले असल्यामुळे रस्त्यांवर कुठेही कचराकुंडी दिसणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.
महापालिका आयुक्त यशवंत डांगे हे दररोज सकाळी शहराची पाहणी करत असताना ज्या ठिकाणी कचरा आढळतो, त्या ठिकाणचा कचरा तातडीने उचलण्याच्या सूचना प्रशासनाला देत असतात. स्वच्छतेबाबत त्यांनी सातत्याने पुढाकार घेत विविध उपक्रम राबविले असून स्वतः फिल्डवर उतरून काम करत असल्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांची त्यांना चांगली जाण आहे. शहर अधिक स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी ते सातत्याने विविध उपयोजना राबवत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.
माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, दैनंदिन स्वच्छता करणे ही महापालिकेची जबाबदारी असून प्रशासन ती प्रभावीपणे पार पाडत आहे. मात्र नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखून रस्त्यावर कचरा न टाकता तो घंटागाडीतच द्यावा. नागरिकांच्या सक्रिय सहभागातूनच स्वच्छ, सुंदर आणि निरोगी अहिल्यानगर घडू शकते. त्यामुळे महापालिकेने सुरू केलेल्या या विशेष स्वच्छता अभियानात सर्व नगरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

## अहिल्यानगरमध्ये मोहरम विसर्जन शांततेत

अभिनंदन केले व पाठीवर कौतुकाची थाप दिली.

‘अहिल्यानगर पोलिसांनी दाखवलेली तत्परता आणि केलेले चोख नियोजन यामुळेच हा सण शांततेत पार पडला. संपूर्ण पोलीस दलाचे कार्य कौतुकास्पद आहे.’

## एकही बालक सुटू नये, हीच पोलिओ निर्मूलनाची गुरुकिल्ली - महापौर

आपल्या जवळच्या पोलिओ बूथवर जाऊन मुलांना पोलिओ लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन त्यांनी केले. महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने पोलिओ जनजागृती आणि लसीकरण प्रोत्साहनासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज आयोजित करण्यात आलेल्या सायकल रॅलीच्या माध्यमातून शहरभर पल्स पोलिओ मोहिमेचा प्रभावी संदेश देण्यात आला आहे. लसीकरणाबाबतचे गैरसमज दूर करून प्रत्येक पात्र बालकापर्यंत ‘पोलिओचे दोन थेंब आयुष्याचे’ हा संदेश पोहोचविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

ते पुढे म्हणाले की, प्रत्येक बालकाला पोलिओ लसीचा लाभ मिळणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. विशेषतः स्थलांतरित कामगारांची मुले, झोपडपट्टी परिसरातील बालके आणि दुर्गम भागातील मुलांपर्यंत लसीकरण पोहोचविण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. ‘‘प्रत्येक डोस मुलांचे संरक्षण अधिक बळकट करतो,’’ असे त्यांनी नमूद केले. आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांनी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेची सविस्तर माहिती देत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. या जनजागृती रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी स्वतः सायकल चालवत रॅलीमध्ये सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी नागरिकांमध्ये पल्स पोलिओ लसीकरणाबाबत जनजागृती करत प्रत्येक पालकापर्यंत पोलिओमुक्त भारताचा संदेश पोहोचविण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण रॅलीदरम्यान ‘‘एकही बालक सुटू नये’’ या घोषवाक्याने परिसर दुमदुमून गेला आणि पोलिओ निर्मूलनाबाबत जनजागृतीचा प्रभावी संदेश नागरिकांपर्यंत पोहोचला.